महाराष्ट्र शासन

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई - ४०० ०३२.

दूरध्वनी क्र ०२२-२२७९३०५१ Email ID : napu22.mhpds@gov.in

---

क्रमांक : क्र. अधापु- २०२०/ प्र.क्र. ६०/ना.पु.-२२ दिनांक : ३१ मार्च, २०२०

प्रति

१) जिल्हाधिकारी (सर्व जिल्हे)
२) नियंत्रक, शिधावाटप व संचालक, नागरी पुरवठा (गो/वा), मुंबई.
३) सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी,
४) अन्नधान्य वितरण अधिकारी (पुणे, नागपूर, सोलापूर),

विषय :- Novel Corona Virus (COVID-१९) प्रादुर्भावाच्या पार्श्वभुमीवर प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजनेअंतर्गत राज्यातील सार्वजनिक वितरण व्यवस्थेंतर्गत पात्र लाभार्थ्यांसाठी माहे एप्रिल ते जून, २०२० करिता मोफत वितरीत करावयाच्या तांदळाचे मासिक नियतन.

संदर्भ :- १) केंद्र शासन आदेश क्र. F.No.७-१/२०१९(ii)-BP.III, दि. ३०.३.२०२०
२) केंद्र शासनाचे पत्र क्र. F.No.७-१/२०१९(ii)-BP.III, दि. ३०.३.२०२० चे पत्र.
३) शासन परिपत्रक क्र. संकिर्ण-२०२०/प्र.क्र.५६/सं.क., दि. ३१.३.२०२०.

केंद्र शासनाने संदर्भाधीन दि. ३०.३.२०२० च्या आदेशान्वये देशातील Corona Virus (Covid-१९) प्रादुर्भावाच्या पार्श्वभुमीवर प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजनेअंतर्गत सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील पात्र लाभार्थ्यांसाठी माहे एप्रिल ते जून, २०२० या कालावधीसाठी राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेंतर्गत अनुज्ञेय असलेल्या अन्नधान्याव्यतिरिक्त प्रतिसदस्य प्रतिमाह ५ किलो अन्नधान्य मोफत वितरीत करण्याचे आदेश दिले आहेत. सदर आदेशानुसार प्राधान्य कुटुंब लाभार्थ्यांना प्रतिसदस्य प्रतिमाह ५ किलो अन्नधान्य त्याचप्रमाणे अंत्योदय अन्न योजना कुटुंबांतील सदस्यांनादेखील त्या कुटुंबामध्ये शिधापत्रिकेतील नोंदीनुसार प्रत्यक्ष असलेल्या सदस्यांनादेखील प्रतिसदस्य प्रतिमाह ५ किलो याच परिमाणात मोफत अन्नधान्य वितरीत करावयाचे आहे.

२. केंद्र शासनाच्या संदर्भाधीन दि. ३०.३.२०२० च्या पत्रान्वये सदर लाभार्थ्यांसाठी तांदळाचे नियतन प्राप्त झाले आहे. केंद्र शासनाने मंजूर केलेल्या नियतनाच्या मर्यादेत सार्वजनिक वितरण व्यवस्थेंतर्गत पात्र लाभार्थ्यांसाठी माहे एप्रिल, ते जून, २०२० करिता याद्वारे तांदळाचे नियतन मंजूर

करण्यात येत आहे. जिल्हानिहाय मासिक नियतनाचा तपशिल सोबतच्या विवरणपत्र “अ” व “ब” मध्ये दर्शविण्यात आला आहे.

**३. अ) माहे एप्रिल, मे व जून, २०२० साठी अन्नधान्याच्या दिलेल्या नियमित नियतनानुसार अन्नधान्याचे वाटप त्या-त्या महिन्यात करावे आणि तद्‌नंतर सोबतच्या विवरणपत्रातील नियतनाच्या तक्त्यांमध्ये दर्शविलेल्या परिमाणानुसार लाभार्थ्यांना मोफत तांदळाचे वितरण करावे. सदर मोफत तांदळाचे वाटप करताना त्या लाभार्थ्यांनी नियमित अन्नधान्याची उचल केली आहे याची खातरजमा करावी.**

**ब) वरील निदेशांचे उल्लंघन केल्यास संबंधितांवर शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी.**

४. अंत्योदय अन्न योजना कुटुंबांतील सदस्यांनादेखील प्रतिसदस्य प्रतिमाह ५ किलो याच परिमाणात मोफत अन्नधान्य वितरीत करावयाचे आहे. **उदा. अंत्योदय अन्न योजना कुटुंबांतील लाभार्थ्यांना राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेंतर्गत अनुज्ञेय असलेल्या नियमित ३५ किलो अन्नधान्याचे वितरण केल्यानंतर, सदर अंत्योदय अन्न योजना शिधापत्रिकेतील सदस्य संख्येनुसार प्रतिसदस्य ५ किलो तांदळाचे मोफत वितरण करावयाचे आहे. म्हणजेच अंत्योदय अन्न योजना शिधापत्रिकेवर १ सदस्य असल्यास ५ किलो, २ सदस्य असल्यास १० किलो याप्रमाणे तांदळाचे मोफत वितरण करावयाचे आहे.**

प्राधान्य कुटुंब लाभार्थ्यांनादेखील राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेंतर्गत अनुज्ञेय असलेल्या ५ किलो प्रति सदस्य या परिमाणात अन्नधान्य वितरण केल्यानंतर प्रति सदस्य ५ किलो तांदळाचे मोफत वितरण करावयाचे आहे.

५. नागपूर व अमरावती विभागातील सर्व जिल्हे वगळता इतर जिल्ह्यांनी त्या-त्या जिल्ह्यांसाठी नियमितपणे विहित केलेल्या भारतीय अन्न महामंडळाच्या गोदामामधून सदर मोफत तांदळाची उचल करावी.

माहे एप्रिल, २०२० च्या अतिरिक्त नियतनाच्या उचलीचा व रकमा जमा करण्याचा कालावधी हा केंद्र शासनाच्या संदर्भाधीन दि. ३०.३.२०२० च्या पत्रान्वये कळविल्यानुसार दि. ३०.४.२०२० पर्यंत राहील. माहे मे व जून, २०२० करिता दिलेल्या अतिरिक्त नियतनाच्या उचलीचा व रकमा जमा करण्याचा कालावधी लक्ष्य निर्धारित सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील मुदतीप्रमाणे म्हणजेच नियतन महिन्याच्या आधीच्या महिन्यातील शेवटच्या दिनांकापर्यंत राहील. अतिरिक्त नियतनाच्या उचलीस मुदतवाढ मिळणार नाही. विहीत कालावधीत तांदळाची उचल करण्यास कसूर केल्यास संबंधित जिल्हा पुरवठा अधिकारी/अन्नधान्य वितरण अधिकारी/उपनियंत्रक यांच्यावर कामात कुचराई केल्याबद्दल शिस्तभंगाची कारवाई केली जाईल याची नोंद घ्यावी.

**६. उपरोक्त तांदळाचे वितरण करताना संदर्भाधिन दि. ३१.३.२०२० च्या शासन परिपत्रकान्वये देण्यात आलेल्या सूचनांनुसार रास्तभाव दुकानदारांनी e PoS द्वारे अन्नधान्य वितरीत करणे अनिवार्य राहील.**

**७. सद्यस्थितीत e PoS द्वारे व e PoS शिवाय अन्नधान्याचे वितरण होत असल्याने मागील महिन्यात वितरणानंतर पुढील महिन्याकरिता वाटपासाठी आवश्यक असलेल्या नियमित अन्नधान्याचा आढावा घेण्यात यावा. त्यानुसार पुढील महिन्यासाठी अन्नधान्याची उचल करताना गोदामामध्ये अतिरिक्त साठा जमा होणार नाही, याद्दष्टीने गोदामातील मागील महिन्यापर्यंतच्या अन्नधान्याची शिल्लक विचारात घेऊन याद्वारे दिलेल्या नियतनापैकी आवश्यकते एवढ्याच अन्नधान्याची उचल करावी.**

८. शासनाचे सदर नियतन मंजूरीचे आदेश उपआयुक्त (पुरवठा) व इतर सर्व संबंधितांना ई-मेलद्वारे पाठविण्यात आले आहेत. तरी, नियतन मंजूरीचे आदेश प्राप्त न झाल्यामुळे धान्याची विहित मुदतीत उचल करता आली नाही व त्यामुळे नियतन व्यपगत झाले, ही सबब विचारात घेतली जाणार नाही व याबाबत संबंधितावर जबाबदारी निश्चित करुन शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल.

९. भारतीय अन्न महामंडळाच्या गोदामातून तांदूळ स्विकारताना शासनाच्या निर्देशानुसार नमुने घेऊन संयुक्तपणे तांदळाचा दर्जा तपासून तो समाधानकारक असल्याची खात्री करुनच तांदळाची उचल करण्यात यावी. यासंबंधी शासनाने वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. तसेच सदर संयुक्त तपासणीच्या वेळी उपस्थित असलेल्या भारतीय अन्न महामंडळाच्या व शासनाच्या प्रतिनिधींची नावे, त्यांचे पद व तपासणीचा दिनांक व स्थळ याबाबतची जिल्हानिहाय माहिती अन्नधान्याची उचल पूर्ण झाल्यानंतर तत्काळ शासनास सादर करावी. सदर माहिती पुढील महिन्याच्या शासनाच्या नियतन आदेशापूर्वी प्राप्त न झाल्यास संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी.

१०. शिधापत्रिकाधारकास रास्तभाव धान्य दुकानांच्या माध्यमातून सदर धान्याचे वाटप विहित परिमाणात होत असल्याची खातरजमा करण्याबाबत संबंधितांना सूचना द्याव्यात. अन्नधान्याचे वाटप होत नसल्याबाबत तक्रारी प्राप्त झाल्यास संबंधितावर जबाबदारी निश्चित करुन शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल.

११. सार्वजनिक वितरण व्यवस्था नियंत्रण आदेश, २०१५ मधील तरतूदीनुसार उपरोक्त तांदळाच्या नियतनाचे "उपयोगिता प्रमाणपत्र" सादर करणे अनिवार्य आहे.

१२. **माहे एप्रिल ते जून, २०२०** साठी अंत्योदय अन्न योजना व प्राधान्य कुटुंबातील लाभार्थ्यांकरीता अतिरिक्त नियतनानुसार तांदळाचा साठा मुक्त करण्याच्या सूचना भारतीय अन्न महामंडळास स्वतंत्रपणे देण्यात आल्या आहेत.

(हे. र. वाडीकर)
कार्यासन अधिकारी

सोबत:- विवरणपत्र "अ" व "ब"

प्रत:- १) सर्व उप आयुक्त (पुरवठा)

२)	उपसंचालक,

३)	वित्तीय सल्लागार व उप सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई.

४)	निवड नस्ती (कार्यासन, नापु-२२)

C:\Shashank\Shashank\Additional Allocation\April to May, 2020.docx

Government of Maharashtra
Food, Civil Supplies & Consumer Protection Department,
Madam Cama Road, Hutatma Rajguru Chowk,,
Mantralay Annex, Mumbai-400 032

Telephone: 022-22793051
Email ID : napu22.mhpds@gov.in

---

No.- ADHAPU-2020/C.R.60 /CS-22

Date :- 31st March, 2020

To,

The General Manager (Mah),
Food Corporation of India,
Regional Office (Maharashtra),
FSD Complex,
Dattapada Road, Rajendra Nagar,
Borivali (E), Mumbai- 400 066.

Sub :- Additional Monthly Allocation of Foodgrains for distribution to all beneficiaries under TPDS @ 5Kg per person per month for a period of three months i.e. April to June, 2020.

Ref :- 1) Govt. of India letter No. 7-1/2019 (ii)-BP.III, Dtd. 30.3.2020
2) State Govt. Letter of even no. Dtd. 31st March, 2020.

Sir,

Government of India vide its above referred letter dated 30.3.2020 has sanctioned Additional Monthly Allocation of Foodgrains for distribution to all beneficiaries under TPDS (AAY & PHH) @ 5Kg per person per month for a period of three months i.e. April to June, 2020. Accordingly, the State Government has issued district wise allocation for the said period vide above referred letter dated 31st March, 2020. (copy enclosed).

You are therefore requested to release the allocated quota of Rice for Priority households & AAY category to the nominees of District Collector's and Controller of Rationing, Director, Civil Supplies, Mumbai as per the statement attached under intimation to this Government.

Yours faithfully,

(H. R. Wadikar)
Section Officer,
Government of Maharashtra

Copy to:1) Financial Advisor & Deputy Secretary, F.C.S & C.P. Dept, Mumbai.
2) Select file, Desk CS-22.

C:\Shashank\Shashank\Additional Allocation\April to May, 2020.docx

विवरणपत्र "अ"

शासन पत्र क्र. अधापु- 2020/प्र.क्र. 60 /नापु-22, दि. 31.3.2020 सोबतचे विवरणपत्र "अ"

nCorona Virus (Covid-19) प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजनेअंतर्गत राज्यातील "अंत्योदय अन्न योजने" तील लाभार्थ्यांसाठी माहे एप्रिल ते जून, 2020 करिता मोफत वितरीत करावयाच्या अतिरिक्त तांदळाचे मासिक नियतन

| अ.क्र | जिल्हा | कार्डसंख्या | सदस्य संख्या | मासिक नियतनाचे परिमाण (किग्रॅ) | मासिक नियतन (मे.टन) |
|---|---|---|---|---|---|
| | | | | तांदूळ | तांदूळ |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 7 |
| 1 | A Region | 3307 | 14256 | 5 | 71 |
| | D Region | 2621 | 11299 | 5 | 56 |
| | E Region | 4742 | 20443 | 5 | 102 |
| | F Region | 14968 | 64527 | 5 | 323 |
| | G Region | 4203 | 18119 | 5 | 91 |
| 2 | ठाणे | 50400 | 217274 | 5 | 1086 |
| 3 | पालघर | 92378 | 398242 | 5 | 1991 |
| 4 | रायगड | 84184 | 362917 | 5 | 1815 |
| 5 | रत्नागिरी | 41279 | 177954 | 5 | 890 |
| 6 | सिंधुदुर्ग | 26072 | 112396 | 5 | 562 |
| 7 | नाशिक | 178654 | 770177 | 5 | 3851 |
| 8 | धुळे | 77222 | 332904 | 5 | 1665 |
| 9 | जळगांव | 135893 | 585835 | 5 | 2929 |
| 10 | नंदूरबार | 97433 | 420034 | 5 | 2100 |
| 11 | अहमदनगर | 92803 | 400074 | 5 | 2000 |
| 12 | पुणे ग्रामीण | 51611 | 222495 | 5 | 1112 |
| 13 | पुणे शहर | 12200 | 52594 | 5 | 263 |
| 14 | सोलापूर ग्रामीण | 55226 | 238079 | 5 | 1190 |
| 15 | सोलापूर शहर | 8312 | 35833 | 5 | 179 |
| 16 | कोल्हापूर | 56495 | 243550 | 5 | 1218 |
| 17 | सांगली | 34298 | 147859 | 5 | 739 |
| 18 | सातारा | 32529 | 140233 | 5 | 701 |
| 19 | औरंगाबाद | 67119 | 289350 | 5 | 1447 |
| 20 | जालना | 46324 | 199703 | 5 | 999 |
| 21 | नांदेड | 80488 | 346984 | 5 | 1735 |
| 22 | बीड | 35095 | 151295 | 5 | 756 |
| 23 | उस्मानाबाद | 40712 | 175509 | 5 | 879 |
| 24 | परभणी | 43655 | 188197 | 5 | 941 |
| 25 | लातूर | 43700 | 188391 | 5 | 942 |
| 26 | हिंगोली | 30770 | 132649 | 5 | 663 |
| 27 | अमरावती | 122642 | 528710 | 5 | 2644 |
| 28 | वाशिम | 50529 | 217831 | 5 | 1089 |
| 29 | अकोला | 45923 | 197974 | 5 | 990 |
| 30 | बुलढाणा | 66758 | 287794 | 5 | 1439 |
| 31 | यवतमाळ | 122622 | 528623 | 5 | 2643 |
| 32 | नागपूर ग्रामीण | 75883 | 327132 | 5 | 1636 |
| 33 | नागपूर शहर | 46078 | 198642 | 5 | 993 |
| 34 | वर्धा | 47259 | 203734 | 5 | 1019 |
| 35 | भंडारा | 67375 | 290454 | 5 | 1452 |
| 36 | गोंदिया | 81207 | 350083 | 5 | 1750 |
| 37 | चंद्रपूर | 139251 | 600311 | 5 | 3002 |
| 38 | गडचिरोली | 95080 | 409890 | 5 | 2049 |
| राज्याची एकूण | | 2505300 | 10800348 | | 54002 |

## विवरणपत्र "ब"

शासन पत्र क्र. अधापु- 2020/प्र.क्र. 60 /नापु-22, दि. 31.3.2020 सोबतचे विवरणपत्र "ब"

**nCorona Virus (Covid-19) प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजनेअंतर्गत राज्यातील "प्राधान्य कुटुंबातील लाभार्थ्यां" साठी माहे एप्रिल ते जून, 2020 करिता मोफत वितरीत करावयाच्या अतिरिक्त तांदळाचे मासिक नियतन**

| अ.क्र | जिल्हा | लाभार्थी सदस्यसंख्या | मासिक नियतनाचे परिमाण (किग्रॅ) | मासिक नियतन (मे.टन) |
|---|---|---|---|---|
| | | | तांदूळ | तांदूळ |
| 1 | 2 | 3 | 5 | 7 |
| 1 | A Region | 722610 | 5 | 3613 |
| | D Region | 981059 | 5 | 4905 |
| | E Region | 2124889 | 5 | 10624 |
| | F Region | 2804695 | 5 | 14024 |
| | G Region | 1190624 | 5 | 5953 |
| 2 | ठाणे | 594719 | 5 | 2974 |
| 3 | पालघर | 1479079 | 5 | 7395 |
| 4 | रायगड | 1489630 | 5 | 7448 |
| 5 | रत्नागिरी | 1063367 | 5 | 5317 |
| 6 | सिंधुदुर्ग | 683800 | 5 | 3419 |
| 7 | नाशिक | 2883732 | 5 | 14419 |
| 8 | धुळे | 1199072 | 5 | 5995 |
| 9 | जळगांव | 2230773 | 5 | 11154 |
| 10 | नंदूरबार | 727483 | 5 | 3637 |
| 11 | अहमदनगर | 2710601 | 5 | 13553 |
| 12 | पुणे ग्रामीण | 2488287 | 5 | 12441 |
| 13 | पुणे शहर | 1346230 | 5 | 6731 |
| 14 | सोलापूर ग्रामीण | 1778427 | 5 | 8892 |
| 15 | सोलापूर शहर | 537606 | 5 | 2688 |
| 16 | कोल्हापूर | 2365211 | 5 | 11826 |
| 17 | सांगली | 1795871 | 5 | 8979 |
| 18 | सातारा | 1722819 | 5 | 8614 |
| 19 | औरंगाबाद | 1962827 | 5 | 9814 |
| 20 | जालना | 1336608 | 5 | 6683 |
| 21 | नांदेड | 1928902 | 5 | 9645 |
| 22 | बीड | 1416510 | 5 | 7083 |
| 23 | उस्मानाबाद | 1055706 | 5 | 5279 |
| 24 | परभणी | 1020620 | 5 | 5103 |
| 25 | लातूर | 1538217 | 5 | 7691 |
| 26 | हिंगोली | 778970 | 5 | 3895 |
| 27 | अमरावती | 1392444 | 5 | 6962 |
| 28 | वाशिम | 839894 | 5 | 4199 |
| 29 | अकोला | 1129340 | 5 | 5647 |
| 30 | बुलढाणा | 1567103 | 5 | 7836 |
| 31 | यवतमाळ | 1464023 | 5 | 7320 |
| 32 | नागपूर ग्रामीण | 1288203 | 5 | 6441 |
| 33 | नागपूर शहर | 1424841 | 5 | 7124 |
| 34 | वर्धा | 869458 | 5 | 4347 |
| 35 | भंडारा | 821110 | 5 | 4106 |
| 36 | गोंदिया | 777790 | 5 | 3889 |
| 37 | चंद्रपूर | 1123540 | 5 | 5618 |
| 38 | गडचिरोली | 559341 | 5 | 2797 |
| राज्याची एकूण | | 59216031 | | 296080 |